## भटक्या विमुक्तांना क्रिमीलेअर संज्ञेमधून वगळण्याबाबत

(८) * ११४३६ श्री.हरिसिंग राठोड, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद : तारांकित प्रश्न क्रमांक ७५९९ ला दिनांक २० जुलै, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात: सन्माननीय सामाजिक न्याय मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भटक्या विमुक्तांना क्रिमीलेअर संज्ञेमधून वगळण्याबाबत पावसाळी अधिवेशन २०१५ संपल्यानंतर एका महिन्याच्या आत भटक्या विमुक्तांना क्रिमिलेयर मधून वगळण्यात येईल असे आश्वासन मा.सामाजिक न्याय मंत्री यांनी दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भटक्या विमुक्तांना क्रिमीलेअर मधून वगळण्यात यावे असा अहवाल राज्य मागासवर्ग आयोग, पुणे यांनी देऊन सुध्दा भटक्या विमुक्तांना क्रिमीलेअरमधून वगळण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने दिलेल्या आश्वासनाची पूर्तता करण्यात येणार आहे काय, तसेच विमुक्तांना क्रिमीलेअरमधून केव्हा वगळण्यात येणार आहे,

(४) याबाबत शासनाचे नेमके धोरण काय आहे ?

**श्री. राजकुमार बडोले** : (१) होय.

(२) होय.

(३) भटक्या विमुक्तांना क्रिमिलेअर संज्ञेमधून वगळण्याबाबतचा प्रस्ताव मंत्रीमंडळासमोर सादर करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

# भटक्या विमुक्तांना क्रिमीलेअरमधून वगळणार - ना. बडोले

*८ डिसेंबर (प्रतिनिधी)* **नागपूर:** भटक्या विमुक्तांना क्रिमीलेअर संज्ञेमधून वगळण्याचा प्रस्ताव मंत्रीमंडळाच्या समोर सादर करण्याची कार्यवाही सुरू असून त्यांना लवकरच क्रिमीलेअरमधून वगळण्यात येईल, असे आश्वासन सामाजिक न्यायमंत्री राजकुमार बडोले यांनी विधानपरिषदेत दिली.

भटक्या विमुक्त समाज आणि बारा बलुतेदार अशा परंपरागत व्यवसाय करणाऱ्या लोकांना क्रिमीलेअर लागू होत नसतानाही सरकारने मात्र या लोकांवर अन्याय केला आहे.

एकीकडे कायदेशीररित्या क्रिमीलेअर या संज्ञेमध्ये हे लोक येत नसतानाही आणि राष्ट्रीय मागासवर्ग आयोगाने क्रिमीलेअरची उत्पन्नाची मर्यादा १० लाख रुपये असावी अशी शिफारस केली असतानाही शासन मात्र मागासवर्गीय घटकावर अन्याय करीत आहे. तेव्हा, भटक्या विमुक्तांना क्रिमीलेअरमधून कधी वगळणार, असा मुद्दा आमदार हरिभाऊ राठोड यांनी तारांकित प्रश्नाद्वारे उपस्थित केला होता. या प्रश्नावर ना. बडोले यांनी वरीलप्रमाणे उत्तर दिले.

यापुर्वी भटक्या विमुक्तांना क्रिमीलेअरमधून वगळण्यात यावे, असा अहवाल पुणे येथील राज्य मागासवर्ग आयोगाकडे पाठवला होता. परंतु आयोगाने सुद्धा भटक्या विमुक्तांना वगळण्यात आले नाही. त्यामुळे याबाबतचा निर्णय मंत्रीमंडळाच्या बैठकीत घेण्याचे ठरवण्यात आल्याचेही बडोले यांनी स्पष्ट केले.

# क्रीमिलिअरचा प्रश्न महिनाभरात निकाली

## दिलासा : सामाजिक न्याय मंत्री बडोले यांचे आश्वासन

**मुंबई** : भटक्या विमुक्तांना क्रीमिलिअरमधून वगळण्याचा प्रश्न एका महिन्यात निकाली काढण्याचे आश्वासन राज्याचे सामाजिक न्याय मंत्री राजकुमार बडोले यांनी विधान परिषदेत दिले.

काँग्रेस सदस्य हरिभाऊ राठोड यांनी भटक्या विमुक्तांना क्रीमिलिअरमधून वगळण्याचा मुद्दा प्रश्नोत्तराच्या तासादरम्यान उपस्थित केला. त्याला उत्तर देताना सामाजिक न्याय मंत्री म्हणाले की, यासंदर्भात राज्य मागासवर्ग आयोगाचा अहवाल शासनाला प्राप्त झाला आहे. त्यावर विधी व न्याय तसेच सामान्य प्रशासन विभागाचा अभिप्राय मागविण्यात आला आहे. ही सर्व प्रक्रिया महिनाभरात पूर्ण होऊन निर्णय घेण्यात येईल.

मात्र, राज्य मागासवर्ग आयोगाचा अहवाल १ नोव्हेंबर २०१४ रोजीच राज्य शासनास मिळाला असताना अद्याप निर्णय का झाला नाही, असा प्रश्न विरोधी सदस्यांनी उपस्थित केला. यावर, त्या वेळी राज्यात आचारसंहिता लागू असल्याने निर्णय झाला नाही. त्यामुळे यासंदर्भात अधिवेशनानंतर पहिल्या आठवड्यात या समाजातील संघटना तसेच विधिमंडळ सदस्यांची बैठक घेऊन सकारात्मक निर्णय घेण्यात येईल, असे सामाजिक न्याय राज्यमंत्री दिलीप कांबळे यांनी सांगितले.

### विशेष विद्यार्थ्यांसाठी लवकरच धोरण - राज्यमंत्री दिलीप कांबळे

अपंगांसाठीच्या संस्थांमधील विशेष शिक्षकांच्या मागण्यांसदर्भात लक्ष देण्याची गरज असून, या क्षेत्रातील तज्ज्ञांची बैठक घेऊन राज्य शासन लवकरच धोरण जाहीर करेल, अशी माहिती सामाजिक न्याय राज्यमंत्री दिलीप कांबळे यांनी आज विधान परिषदेत प्रश्नोत्तराच्या तासात दिली.

लोक भारतीचे कपिल पाटील यांनी मुंबई उपनगरातील अपंग संस्थांना अनुदान तसेच शिक्षकांना नियमित वेतन मिळण्यासाठी शासनाने करावयाच्या कार्यवाहीबाबत प्रश्न उपस्थित केला होता. त्याला उत्तर देताना कांबळे म्हणाले की, अपंग संस्थांना निधीच्या उपलब्धतेनुसार अनुदान वितरित करण्यात येते.

अपंग शाळा कर्मचाऱ्यांना वेळेवर वेतन देण्यासाठी समाज सेवार्थ प्रणाली नव्याने विकसित करण्यात आली आहे. विशेष शाळेतील शिक्षकांच्या मागण्यांकडे शासन लक्ष देत असून, तज्ज्ञांची बैठक घेऊन यासंदर्भात धोरण तयार करण्यात येईल, असेही कांबळे यांनी सांगितले.

**परिषद प्रश्नोत्तरे**

### पाताळगंगा नदीवरील टोल बंद करणार



राष्ट्रीय महामार्गावरील पेण खारपाडा येथील पाताळगंगा नदीवर असलेल्या टोलनाक्यावरील टोल येत्या ऑगस्ट अखेर बंद करण्यात येईल, अशी माहिती सार्वजनिक बांधकाम राज्यमंत्री प्रवीण पोटे-पाटील यांनी विधान परिषदेमध्ये प्रश्नोत्तराच्या तासात दिली. काँग्रेस सदस्य हुस्नबानो खलिफे यांनी याबाबतचा मुद्दा उपस्थित केला. सदर पुलावर कंत्राटदार कंपनीला ३३.३३ कोटींचा खर्च आला. खर्चाच्या चारपट १२० कोटी इतकी टोलवसुली करण्यात आल्याचे खलिफे यांनी सांगितले. त्याला उत्तर देताना राज्यमंत्री पोटे-पाटील म्हणाले की, या टोलनाक्यावरील टोल बंद करण्याचा आदेश काढण्यासाठी केंद्र शासनाकडे २९ जून २०१५ला प्रस्ताव सादर करण्यात आला होता. केंद्र शासनाच्या मंजुरीनंतर २८ ऑगस्टपासून सदर टोल बंद करण्यात येईल.